# अनामप्रेम स्नेह - वार्ता

# ANAMPREM NEWSLETTER

WWW.ANAMPREM.ORG
मासिक पत्रिका - एप्रिल 2025













## APRIL HIGHLIGHT

- "माननीय प्रियंका शर्मा, वरिष्ठ मंडल सुरक्षा आयुक्त (RPF), पुणे रेल्वे यांचा वाढदिवस अनामप्रेम संस्थेच्या हिंमतभवन प्रकल्पात साजरा करण्यात आला.यावेळी त्यांना संस्थेची संपूर्ण माहिती देण्यात आली. उपस्थित अधिकाऱ्यांनी अनामप्रेमचे रेल्वे विभागाशी संबंधित काही काम असेल तर आम्ही संस्थेला नक्कीच मदत करू असे आश्वासन दिले.

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती ‘अनामप्रेम सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक’ येथे उत्साहात साजरी. विद्यार्थ्यांना दिला संविधानाचा संदेश..भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती ‘अनामप्रेम सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक’ येथे अत्यंत उत्साह, अभिमान आणि सामाजिक बांधिलकीने साजरी करण्यात आली.

- मंगळवार दिनांक १५ एप्रिल रोजी अनामप्रेम संस्थेच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात विश्वस्तांच्या उपस्थितीत प्रकल्प प्रमुख व विभाग प्रमुख यांची महत्त्वपूर्ण मासिक बैठक पार पडली. या बैठकीस संस्थेचे अध्यक्ष इंजि. अजित माने आणि सचिव श्री. अनिल गावडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या मिटिंगमध्ये पुण्याच्या निर्माल्य चॅरिटेबल ट्रस्ट चे श्री. बेदरकर साहेब व सौ. बेदरकर मॅडम यांचेसुद्धा विशेष मार्गदर्शन मिळाले.



Scanned with OKEN Scanner

# Anamprem Highlights

www.anamprem.org



## अनामप्रेम सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पास VNIT कॉलेज व प्रयास NGO च्या विद्यार्थ्यांची भेट

दिव्यांग मुलांच्या शिक्षण, प्रशिक्षण व रोजगारासाठी कार्यरत असलेल्या अनामप्रेम सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक येथे VNIT कॉलेज व प्रयास NGO, नागपूर येथील ४० विद्यार्थ्यांनी प्रकल्प भेट दिली.

या भेटीदरम्यान शाळेतील विशेष शिक्षक श्री. रामु बांडेबुचे व श्री. राजू भगत यांनी विद्यार्थ्यांना प्रकल्पात चालू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. प्रकल्पामार्फत दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक, व्यावसायिक प्रशिक्षण तसेच आत्मनिर्भरतेसाठी राबवण्यात येणाऱ्या उपक्रमांविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.



### अनामप्रेमच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात मासिक मिटिंग संपन्न..

मंगळवार दिनांक १५ एप्रिल रोजी अनामप्रेम संस्थेच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात विश्वस्तांच्या उपस्थितीत प्रकल्प प्रमुख व विभाग प्रमुख यांची महत्त्वपूर्ण मासिक बैठक पार पडली.
या बैठकीस संस्थेचे अध्यक्ष इंजि. अजित माने आणि सचिव श्री. अनिल गावडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या मिटिंगमध्ये पुण्याच्या निर्माल्य चॅरिटेबल ट्रस्ट चे श्री. बेदरकर साहेब व सौ. बेदरकर मॅडम यांचेसुद्धा विशेष मार्गदर्शन मिळाले.

संस्थेच्या प्रकल्प प्रमुखांनी फेब्रुवारी व मार्च २०२५ या महिन्यांचा सविस्तर मासिक आढावा प्रभावी प्रेझेंटेशनद्वारे सादर केला.

इंजि. माने साहेब व गावडे सर यांनी सध्या सुरु असलेल्या उपक्रमांमध्ये अधिक नाविन्य कसे आणता येईल, यावर मार्गदर्शन करत सर्वांना प्रेरित केले.
दिव्यांगांसाठी अधिक चांगल्या सुविधा कशा मिळू शकतील, या विषयावर देखील सखोल चर्चा झाली.

ही बैठक नव्या संकल्पनांना दिशा देणारी आणि सेवाभावाला बळकटी देणारी ठरली.



## गौरांग अभिनव शाळेत महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती उत्साहात साजरी..

दिव्यांग बांधवांसाठी कार्यरत असलेल्या अनामप्रेम संस्था संचलित गौरांग अभिनव शाळेमध्ये क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना महात्मा फुले यांच्या जीवनकार्याची माहिती देण्यात आली. त्यांनी सामाजिक सुधारणा, स्त्री-शिक्षण आणि शेतकरी हितासाठी केलेल्या योगदानाचे विवेचन करण्यात आले. या कार्यक्रमादरम्यान गौरांग अभिनव शाळेचे विशेष शिक्षक श्री.रामु बांडेबुचे श्री.राजू भगत, श्रीमती. सुरेखा कोतकर, प्रकल्प समन्वयक, कार्यकर्त्यांसह प्रकल्पातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जागरुकता निर्माण होण्यास मदत झाली असून महात्मा फुले यांच्या विचारांचे महत्त्व देखील यावेळी त्यांच्यात रुजविण्यात आले.



Scanned with OKEN Scanner

# ANAMPREM
# MARATHWADA PROJECT

APRIL -2025

"अनामप्रेम संस्थेला उद्योगपती श्री. श्यामजी लड्ढा व त्यांच्या स्नुषा सौ. विशाखा लड्ढा (उच्चशिक्षित कंपनी सेक्रेटरी व MBA) यांनी सदिच्छा भेट दिली.






इनर व्हील क्लब ऑफ औरंगाबाद लोटसच्या प्रेसिडेंट श्रीमती लता केला व त्यांच्या सहकारी श्रीमती मोनाली लकडे, श्रीमती सारिका क्षत्रिय, श्रीमती स्मिता कोलते यांनी आज संस्थेला सदिच्छा भेट दिली.
या वेळी क्लबतर्फे 15-20 व्यक्तींचे जेवण सहज वाहून नेता येईल अशा दोन मोठ्या साईजचे स्टर्डी टिफिन कॅरिअर भेट देण्यात आले. या उपयुक्त भेटीमुळे केटरर्समार्फत विद्यार्थ्यांसाठी अन्नपुरवठा अधिक सोयीचा होणार आहे.

Association of Women Enterprises of Maharashtra, छत्रपती संभाजीनगर शाखेतर्फे आयोजित दोन दिवसीय एक्सिबिशनमध्ये, इनर व्हील क्लब ऑफ औरंगाबाद लोटसच्या अध्यक्षा सौ. लता केला यांच्या सहकार्याने 'अनामप्रेम' साठी मोफत स्टॉल उपलब्ध.






Scanned with OKEN Scanner

# GAURANG ABHINAV SCHOOL UPDATE






**११ एप्रिल २०२५ रोजी पारनेर पंचायत समितीचे मा. कराळे मॅडम, मा. बांडे सर व मा. धुमाळ सर यांनी गौरांग अभिनव शाळेस सदिच्छा भेट दिली.**

**या भेटीत त्यांनी अंध विद्यार्थ्यांच्या शिक्षण पद्धती, लेखन-वाचन कौशल्ये आत्मसात करण्याच्या प्रक्रिया तसेच त्यांच्यासमोरील अडचणी समजून घेतल्या.**

**अनामप्रेम संस्था संचलित गौरांग अभिनव शाळेतील सर्व अंध व अस्थिव्यंग विद्यार्थ्यांनी यशस्वीरित्या वार्षिक परीक्षा पूर्ण केली.**





गौरांग अभिनव शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



Scanned with OKEN Scanner

## "सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक येथे सौ. सुषमा आपटे मॅडम, मा. श्री. दत्तात्रेय व्ही. आपटे साहेब व त्यांचा समस्त परिवार यांच्यासह स्नेहालय संस्थेचे संस्थापक डॉ. गिरीश कुलकर्णी आणि कार्यकर्ते अजय वाबळे यांची सदिच्छा भेट झाली.









## अनामप्रेम संस्थेत राहणाऱ्या ११वी वर्गातील मूकबधिर विद्यार्थ्यांचा पालक मेळावा मोठ्या उत्साहात व सकारात्मक वातावरणात संपन्न झाला.







या मेळाव्यात पालक आणि संस्थेच्या प्रतिनिधींमध्ये वर्षभरातील विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा सखोल आढावा घेण्यात आला. त्यांनी नवीन शिकलेले अनुभव, झालेल्या चुका आणि त्यातून घेतलेले धडे यावर खुलेपणाने चर्चा केली.

पुढील शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता अधिक वाढवण्यासाठी आणि शिस्तबद्धतेसाठी नव्या नियमावलीबाबत पालक व संस्थेचा संयुक्त पुढाकार महत्त्वपूर्ण ठरला.



Scanned with OKEN Scanner

"सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक येथे डॉ. दिलीप पेशवे साहेब व स्नेहालयचे कार्यकर्ते श्री. भारत कुलकर्णी यांची सदिच्छा भेट झाली.

या भेटीमुळे प्रकल्पातील सामाजिक कार्याला नवी दिशा व प्रेरणा मिळाली. समाज परिवर्तनासाठी त्यांचे विचार, मार्गदर्शन आणि अनुभव हे सर्वांसाठी अत्यंत मौल्यवान ठरले.

.






आदरणीय श्री सतीश मोहनराव भिडे.


एक निष्काम कर्मयोगी.

अनामप्रेमचे विश्वस्त सीए श्री सतीश सोमण व डॉक्टर सायली सोमण यांच्या माध्यमातून संस्थेशी जोडले गेलेले पुण्यातील एक सुप्रसिद्ध उद्योगपती श्री सतीश मोहनराव भिडे यांनी कोणत्याही प्रकारचा गाजावाजा न करता संस्थेला मोठी आर्थिक मदत केली. संस्था त्यांची कायमच ऋणी आहे.




अनामप्रेम "सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पाच्या माध्यमातून अपंग समावेशीत शिक्षणासाठी दिली जाणारी शिष्यवृत्ती इसळक जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील 7 विद्यार्थ्यांच्या खात्यावर यशस्वीरित्या जमा झाली आहे. या शिष्यवृत्तीमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या वाटचालीला नवे बळ मिळेल. दिव्यांग विद्यार्थ्यांना सक्षम भवितव्याच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल

Scanned with OKEN Scanner







# Visitors








"एक कदम और फाउंडेशन, पुणे यांच्या सौजन्याने अनामप्रेम संचलित ग्राम प्रकल्पातील 7 अंध विद्यार्थ्यांना मोबाईल व कीबोर्ड भेट देण्यात आले.

या उपक्रमामुळे तंत्रज्ञानाच्या मदतीने त्यांच्या शिक्षणात अधिक सुलभता व स्वावलंबनाची दिशा मिळेल. ही मदत म्हणजे केवळ साधनांची नव्हे, तर आत्मविश्वास व प्रगतीची उभारी देणारी प्रेरणा आहे.

•

## प्रकल्पातील विविध मेंटनस ची कामे टीम द्वारे पूर्ण









Scanned with OKEN Scanner





# संघर्षातून यशाकडे... अनामप्रेम संस्थेची कन्या श्रावणी आणि ज्ञानेश्वर यांचा विवाह सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न

अनामप्रेम संस्थेतील अंशतः अंध गटातील संस्थेची लाडकी कन्या कु. श्रावणी आणि संस्थेचा माजी विद्यार्थी चि. ज्ञानेश्वर यांचा विवाह सोहळा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून वडाळा बहिरोबा ता.नेवासा जि. अहिल्यानगर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. वधू वर दोघेही शासकीय सेवेत कार्यरत असून, हा विवाह त्यांचा आत्मविश्वास, जिद्द आणि मनोबल वाढविणारा ठरला आहे.






# "अनामप्रेम संस्थेच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पाला CG Power कंपनीच्या CSR टीम सदिच्छा भेट..



Scanned with OKEN Scanner

# PRIYANKA

## प्रेरणादाई जीवनगाथा - प्रियंका अशोक कोबारने





**“जितकी ठेच, तितकी उंच झेप...”**

प्रियंका कोबारणे हिची ही कहाणी खऱ्या अर्थाने प्रेरणादायी आणि मन हेलावून टाकणारी आहे.
प्रियंका.... एका गरीब कुटुंबात जन्मलेली एक सामान्य मुलगी, बालपणात अंधत्व येणे, पालकांचे निधन होणे, अंधत्वावर मात करून शिक्षण घेणे, आयुष्यातील संकटांवर मात करून यश मिळवणे आणि मग एक उत्तम जोडीदार मिळवून संसार उभारणे — या सगळ्या टप्प्यांमधून प्रियंकाने जीवनातली प्रत्येक परीक्षा आत्मविश्वासाने आणि संयमाने दिली आहे.

### एका लहान गावातून सुरुवात -

प्रियंका हिचा जन्म ५ ऑगस्ट १९९७ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील गणेगाव येथे एका अत्यंत गरीब कुटुंबात झाला. वडील कारखान्यात काम करणारे आणि आई हॉस्पिटलमध्ये स्वच्छतेचे काम करणारी. प्रियंका पहिली ते पाचवीपर्यंत गणेगावच्या छत्रपती शिवाजी हायस्कूलमध्ये शिकली. पाचवीत असताना अचानक तिची दृष्टी गेली आणि तिचे आयुष्य जणू अंधकारमय झाले. आता मात्र तिच्या आयुष्याचा प्रवास वेगळ्याच दिशेने चालू झाला.

### अनामप्रेम संस्थेशी भेट -

अंधत्वामुळे प्रियंकाच्या शिक्षणात अनेक अडथळे आले. तिच्या गावात केवळ आठवीपर्यंत शिक्षणाची सोय असल्याने, पुढे शिकण्याची तिची आशाच मावळली होती. नेमके त्याच वेळी गावातील एका व्यक्तीमार्फत प्रियंकाच्या वडिलांना अनामप्रेम संस्थेची माहिती मिळाली आणि तिच्या अंधकारमय जीवनात एक नवीन आशेचा किरण निर्माण झाला. अशा रीतीने तिचा अनामप्रेम संस्थेत प्रवेश झाला आणि तिच्या आयुष्याला एक निर्णायक वळण लागले.



Scanned with OKEN Scanner

# MANOJ & PRIYANKA

April - 2025

# SUCCESS STORIES

**दुःखामागून दुःख** -
अनामप्रेममध्ये नववीत प्रवेश घेतल्यानंतर काही महिन्यांतच प्रियंकाच्या वडिलांचे हृदयविकाराच्या झटक्याने अकाली निधन झाले. त्यानंतर थोड्याच दिवसात तापाचे निमित्त होऊन तिच्या आईचे सुद्धा निधन झाले. आई वडील दोघांचेही कृपाछत्र डोक्यावरून गेल्याने एकटेपणाचे सावट तिच्यावर आले. या धक्क्यातून सावरण्यासाठी अनामप्रेम संस्थेने तिच्या आयुष्याला नवा आधार दिला, आई-वडिलांचे प्रेम, शिक्षणाची संधी आणि जगण्याची उमेद दिली.

**शिक्षणाची वाटचाल**
प्रियंकाने नववी ते बारावीपर्यंतचे शिक्षण नगर शहरातील पाऊलबुद्धे शाळा व मार्कंडेय विद्यालयात पूर्ण केले. संस्थेच्या प्रेरणेमुळे तिने पुढे न्यू आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, अहमदनगर येथून पदवी देखील पूर्ण केली.

**आयुष्याचा जोडीदार - मनोज दंडीमे**
आई-वडिलांचे छत्र हरविलेल्या प्रियंकासाठी संस्थेनेच पालकत्वाच्या नात्याने प्रियंकाच्या लग्नासाठी स्थळ शोधायला सुरुवात केली.
मनोज दंडीमे, अनामप्रेमचा माजी विद्यार्थी. शांत, कष्टाळू स्वभावाचा तरुण. मनोज लातूर जिल्ह्यातील अहमदपूरचा रहिवासी असून तो अस्थिव्यंग गटातील आहे. त्याच्याशी प्रियंकाच्या लग्नाची जुळवाजुळव झाली. दोघांनीही एकमेकांना मनोमन पसंत केले. ८ डिसेंबर २०२४ रोजी पुण्यात प्रियंका व मनोज यांचा विवाह पार पडला. अंध व अस्थिव्यंग गटातील असलेल्या या दोघांचा एकत्र संसार समाजासाठी एक प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे.

**प्रियंकाच आजचं जीवन**
आज प्रियंका घरातील सर्व कामे - स्वयंपाक, स्वच्छता, धुणीभांडी अंध असूनही, सहजतेने, आनंदाने करते. अंधत्व हा अडथळा न मानता ती सामर्थ्याने सर्व गोष्टी लीलया करत आहे. प्रियंका समाजासाठी एक आदर्श आणि प्रेरणास्रोत बनली आहे.

**प्रियंकाच अनामप्रेम संस्थेविषयी मनोगत** -
प्रियंका आज अभिमानाने सांगते की "अनामप्रेम संस्था ही माझी खरी मायबाप आहे. मला अंध म्हणून नाही, तर एक व्यक्ती म्हणून माझं संगोपन करणारी, आधार देणारी ही माझी माता असून माझं आजचं यश अनामप्रेम मुळेच शक्य झालं आहे."

**“ शेवटी सुख हे मानण्यावर असते.”**
प्रियंकाच्या जीवनाने हे दाखवून दिलं आहे की, अचानक आलेले अपंगत्व, नियतीने लादलेले अनाथपण, गरीबीची परिस्थिती यासारख्या अनंत अडचणींवर मनाच्या ताकदीने आणि योग्य आधाराने मात करत माणूस यशस्वी होऊ शकतो. प्रियंका केवळ एक विद्यार्थिनी नसून ती असंख्य दिव्यांगांसाठी एक प्रेरणास्तंभ झाली आहे.

प्रियंकाच्या कर्तुत्वाला मानाचा मुजरा..!




Scanned with OKEN Scanner

# ANAMPREM SKILL DEVELOPMENT CENTRE UDYOG BHAVAN

# Anamprem Products



## 1. Napkin bouquet

"दिव्यांग बांधवांनी तयार केलेले नॅपकिन बुके विक्रीसाठी उपलब्ध - त्यांच्या कौशल्याला प्रोत्साहन द्या, आणि विशेष उपक्रमात सहभागी व्हा!"

## 2.Sathi chappal udyog

दिव्यांग बांधवांनी आत्मनिर्भरतेच्या दिशेने टाकलेलं महत्त्वाचं पाऊल - त्यांनी तयार केलेल्या साथी चप्पल विक्रीसाठी उपलब्ध आहेत.
आपल्या खरेदीतून त्यांना प्रेरणा आणि आधार मिळेल.
कृपया पुढे येऊन हे उत्पादने खरेदी करा आणि त्यांच्या मेहनतीस हातभार लावा!










## 3. Gir Cow Lonkadh Ghee

अनामप्रेम संस्थेच्या गोशाळेत पारंपरिक पद्धतीने तयार केलेले शुद्ध तूप आता विक्रीसाठी उपलब्ध आहे.
हे तूप केवळ दर्जेदारच नाही, तर संस्थेच्या सेवाभावी कार्यासही मदतीचे हात देणारे आहे.
कृपया हे तूप खरेदी करून सेवेसोबत स्वादालाही साथ द्या.!



## 4. Bahuguni Anamamrut

अनामप्रेम संस्थेचे "अनामामृत बहुगुणी थेंब" आता विक्रीसाठी उपलब्ध!
दिव्यांग बांधवांनी तयार केलेले... नैसर्गिक, सुरक्षित आणि बहुगुणी!
उपयोग:
सर्दी, खोकला, कफ, अपचन, दाढदुखी यावर गुणकारी
माऊथ फ्रेशनर म्हणूनही उत्तम!
आरोग्यवर्धक थेंब... सेवाभावातून तयार!





## 5. Sanitary Pad

स्वच्छतेची काळजी, सन्मानाची साथ!
अनामप्रेम संस्थेच्या उद्योग भवनात दिव्यांग बांधवांनी तयार केलेले सॅनिटरी पॅड्स आता विक्रीसाठी उपलब्ध
आहेत. हे पॅड्स सुरक्षित आणि आरोग्यदायी असुन स्त्रियांसाठी त्यांची खरीखुरी सखीच आहेत. स्वावलंबनाचं प्रतीक!



अनामप्रेम दिव्यांगनिर्मित उत्पादने मिळवण्याकरिता व अधिक माहितीसाठी संपर्क -7350013805

www.anamprem.org

Scanned with OKEN Scanner

# धन्यवाद...

# अनामप्रेम परिवार

| | |
|---|---|
| • बँकेचे नांव Bank Name | सेंट्रल बँक ऑफ इंडिया Central Bank of India |
| • शाखा Branch | अहमदनगर (महा) Ahmednagar (MH) |
| • खाते क्रमांक/A/c No. : 3486669726 | |
| • आय.एफ.एस.सी.कोड/IFSC Code : CBIN0280670 | |

ANAMPREM

10252110@cbin

## ANAMPREM CONTACT DETAILS

- Himmat Bhavan Project - 7350013806 , 9011004576
- S.J Gram Project - 7350517778 , 9011670123
- Marathwada Project. - 9921509199 , 9011750035
- Anamprem Pune Hostel. - 9422307116 , 9011750022

हे मासिक पत्रक मा.अध्यक्ष अनामप्रेम गांधी मैदान, अहिल्यानगर येथून प्रकाशित केले आहे.

www.anamprem.org

/ANAMPREM

@ANAMPREM_2005

YOU TUBE INSTAGRAM FACEBOOK

Scanned with OKEN Scanner